८.१०.४ कांदेबाग लागवड ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात झाली असेल तर त्यास रासायनिक खंताचा हप्ता युरिया ८२ ग्रॅम प्रति झाड बांगडी पध्दतीने देण्यात यावा. खते लगेच मातीने झाकून घ्यावीत.

८.१०.५ ठिबकद्धारे विद्राव्य खते देण्यासाठी १९:१९:१९ हे विद्राव्य खत ७५ किलो व युरिया १५० किलो ही विद्राव्य खते ७१ ते १४६ दिवसांदरम्यान टप्प्या टप्प्याने ठिबकव्दारे द्यावीत.

८.१०.६ केळीची लागवड केलेल्या चारही बाजूंच्या बांधावरील वेलवर्गीय तणे उपटून नष्ट करावीत. जेणेकरुन विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही.

**८.११. लिंबूवर्गीय फळ पीक सल्ला :**

८.११.१ खोडकिडा किंवा ईंडरबेला या साल खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी अळीच्या छिद्रावरुन जाळे काढून डायक्लोरव्हॉस (७६ ई.सी) १० मि.लि. प्रति लिटर पाणी हे द्रावण इंजेक्शनच्या मदतीने छिद्रात टाकावे. छिद्रावर या द्रावणामध्ये बुडवलेला कापसाचा बोळा लावावा.

८.११.२ या महिन्यामध्ये पाने पोखरणारी अळी, सायट्रस सायलाचा प्रादुर्भाव दिसतो.अंबिया बहाराच्या वेळी सायट्रस सायला नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड ०.५ मि.लि. किंवा क्विनॉलफॉस १.५ मि.लि. किंवा अबामेक्टीन ०.४२ मि.लि. किंवा नोव्हॅल्युरॉन ०.८० मि.लि. प्रति लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास पुढील फवारणी १५ दिवसांच्या अंतराने कीटकनाशक बदलून करावी.

८.११.३ झाडांच्या बुंध्यावर डिंक्याचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास असा भाग चाकुने खरडून त्यावर मेटॅलॅक्झील एस ४ टक्के अधिक मॅंकोझेब ६४ टक्के (संयुक्त बुरशीनाशक ) प्रति एक लिटर पाणी याप्रमाणे पेस्ट तयार करुन लावावी.

८.११.४ मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट १५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ७ मिली अथवा ॲसिफेट ७ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

८.११.५ पाने खाणारी अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन (१० ई.सी) २ मि.लि. किंवा डायमिथोएट १.५ मि.लि. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

८.११.६ आंबिया बहारातील फळगळ रोखण्यासाठी जिबरेलिक ॲसीड १.५ ग्रॅम अधिक युरिया एक किलो प्रति १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

९) <u>भाजीपाला</u> :

९.१ फुलकोबीला गड्डे धरण्यापूर्वी जी.ए. १० पीपीएम (१० मिली ग्रॅम प्रति लि. पाणी) व गड्डे धरताना एन.ए.ए. १० पीपीएम फवारावे (१० मिली ग्रॅम/लि. पाणी) तसेच गड्डे पांढरेशुभ्र राहून ते चांगल्या स्थितीत टिकून राहण्यासाठी पीक तसेच गड्डे काढण्यापूर्वी १५ दिवस अगोदर पानाने झाकावे.

९.२ उन्हाळी भेंडी, गवार व वेलवर्गीय भाज्यांची लागवड करा.

९.३ गवारीचे बी १८० पीपीएम जी.ए. द्रावणात (१०० मिलीग्रॅम/लिटर पाणी) तासभर भिजवून लावल्यास उगवण लवकर व एकसारखी होते.

९.४ ढगाळ वातावरण कांदा आणि लसूण या पिकांवर तपकिरी करपा किंवा जांभळा करपा या रोगांचा तसेच फुलकिडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फुलकिडीच्या नियंत्रणासाठी ॲसिफेट ७ ग्रॅम किंवा ईमिडाक्लोप्रिड ७ मिली किंवा कॉन्फिडॉर **१०** मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करपा नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम अथवा कार्बेन्डेझिम १० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.